**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**सार्वत्रिक निवडणूक २०२२**

# प्रारुप प्रभाग रचना : हरकती सुनावणीबाबत जाहीर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२२ करीता दिनांक ०१/०२/२०२२ रोजी प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आली होती. प्रारुप प्रभाग रचनेवर दिनांक ०१/०२/२०२२ ते दिनांक १४/०२/२०२२ (दुपारी ३.००वा) पर्यंत हरकती/सुचना मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर मा.राज्य निवडणूक आयोग यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी शुक्रवार दिनांक २५/०२/२०२२ रोजी सुनावणी घेणार आहेत.

महानगरपालिकेच्या प्रारुप प्रभाग रचनेबाबत ज्या नागरीकांनी हरकती/सुचना दाखल केल्या आहेत अशा सर्व हरकतदार यांना कळविणेत येते की,

आपल्या हरकती/सुचनांची सुनावणी शुक्रवार दिनांक २५/०२/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून ऑटो क्लस्टर डेव्हपमेंट इन्स्टिटयूट लि. एच ब्लॉक सी-१८१ डी-मार्टचे मागे चिंचवड स्टेशन, पुणे-४११ ०१९ या ठिकाणी होणार आहेत. सदर सुनावणीच्या नोटीसा हरकतदारास बजावणेत येत असून जर आपणास सुनावणी नोटीस प्राप्त न झालेस निवडणूक कार्यालय, तळ मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथून दिनांक २४/०२/२०२२ पर्यंत प्राप्त करुन घ्यावी.

सुनावणी हॉलमध्ये प्रवेशासाठी हरकतदारांनी सोबत १) हरकत अर्ज दाखल केल्याची पोहोच २) सुनावणी नोटीसीची प्रत ३) आपली ओळख पटविण्याकरीता ओळखपत्र घेऊन यावे. तसेच कोविड १९ च्या अनुषंगाने सोबत येताना दोन डोस घेतलेचे प्रमाणपत्र, मास्क, सॅनिटायझर सोबत ठेवावे.

**टिप :- हरकत क्रमांकनिहाय सुनावणीचे वेळापत्रक मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर ही माहितीसाठी उपलब्ध आहे.**

सही/-
**( राजेश पाटील )**
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८